# आज उल्कावर्षाव : आकाशात रंगला आहे तेजस्वी खेळ

14 डिसेंबर 2018



**आजची रात्र ही अवकाश संशोधक, अवकाश निरीक्षकांसाठी पर्वणीची ठरणार आहे. कारण उल्कावर्षाव अनुभवण्याची चांगली संधी आजच्या रात्री जगभरात मिळणार आहे.**

महाराष्ट्रातूनही हा वर्षाव दिसणार आहे. निरभ्र आकाशात कोणत्याही दुर्बिणीशिवाय हा वर्षाव पाहाता येईल.

9 डिसेंबर ते 14 डिसेंबर या कालवधीत होत असलेला या उल्कावर्षावाला Geminid Meteor Shower असं म्हटलं जातं.

विशेष म्हणजे कोणत्याही दुर्बिणीशिवाय रात्री 8 ते पहाटे 5पर्यंत उल्कावर्षाव पाहाता येईल. 9 डिसेंबरपासून सुरू असलेला हा उल्का वर्षाव आजही पाहाता येणार आहे.

या उल्का प्रति सेकंद 35 किलोमीटर इतक्या वेगाने पृथ्वीच्या वातावरणात येत आहेत.

- व्हॉएजर 2 : सूर्यमालेच्या पलीकडे पोहचलं नासाचं यान
- 1908 मध्ये सैबेरियात झालेला 'तो' गूढ स्फोट
- मंगळ मोहीम: इनसाईट करणार मंगळावरील भूकंपाचा अभ्यास

कोल्हापुरातील विवेकानंद कॉलेजमधील पदार्थ विज्ञान आणि खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. मिलिंद कारंजकर यांनी या उल्कावर्षाव संदर्भात दिलेली माहिती अशी :

## उल्का वर्षाव म्हणजे काय?

आकाशात अनेक खगोलीय वस्तू फिरत असतात. अशा वस्तू पृथ्वीच्या कक्षेत येतात, पृथ्वीच्या वातावरणामध्ये प्रवेश करताना त्यांचे घनअस्तित्व संपून जाते आणि त्या जळून जातात.



काही मोजक्याच उल्का या पाषाणाच्या स्वरूपात पृथ्वीवर पडत असतात. त्यांचा आकार लहान किंवा मोठा असू शकतो.

## उल्का वर्षाव कधी दिसतो?

वर्षभरात एप्रिल, मे, जून, ऑगस्ट, ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये उल्का वर्षाव दिसतो. डिसेंबरमध्ये होणारा उल्कावर्षाव सर्वोत्तम असतो. या उल्का वर्षावाला Geminid Meteor Shower म्हटलं जातं. यावेळी उल्कांचा मोठा जमाव पृथ्वीच्या कक्षेमधून जाऊ लागला की उल्कांचा वर्षाव पाहायला मिळतो. पृथ्वीची आणि उल्कांची कक्षा ठरलेली आहे. त्यामुळे ठराविक काळात आणि ठराविक वेळेतच उल्कांचा वर्षाव पाहायला मिळतो.

## उल्का आणि तारकासमूह

आकाशामध्ये निरनिराळी तारकासमूह असून ज्या तारकासमूहातून उल्कावर्षाव होतो त्या तारकासमूहाला उल्कावर्षावाचे उगमस्थान म्हटलं जातं. 30 मे ते 14 जून या कालावधीमध्ये होणारा उल्का वर्षाव हा मेष राशीतून होत असतो. 16 ते 26 एप्रिल या कालावधीत स्वरमंडल या तारका पुंजातून उल्का वर्षाव होतो.

त्यांपैकी 21 ते 22 एप्रिलमध्ये होणारा उल्कावर्षाव जास्त असतो. ययाती या तारकासमूहातून दरवर्षी ऑगस्टमध्ये दिनांक 1 ते 20 या कालावधीत उल्का वर्षाव होतो, त्यातही जास्त उल्कावर्षाव 12 ऑगस्टला आढळतो. सिंह राशीतून 11 नोव्हेंबर ते 20 नोव्हेंबर या कालावधीत उल्कावर्षाव होतो. त्यातही 17 नोव्हेंबरला जास्त उल्कावर्षाव दिसून येतो. 24 नोव्हेंबर ते 27 नोव्हेंबर या कालावधीत देवयानी या तारकासमूहातून होत असतो.



डिसेंबर 9 ते 14 या दरम्यान उल्कावर्षाव होणार असून दिनांक 13 डिसेंबरला जास्त प्रमाणात दिसला. तासाला 120च्या दरम्यान उल्का पडलेल्या आढळणार आहेत. या उल्कांचा रंग पिवळसर असतो.

## कोठून आणि कधी पाहू शकाल हा उल्कावर्षाव?

हा उल्कावर्षाव पृथ्वीवर अंधार असणाऱ्या कोणत्याही ठिकाणावरून निरभ्र आकाश आकाशात हा वर्षाव सहज पाहाता येईल.

साधारणपणे मिथुन रास उगवल्यानंतर म्हणजे रात्री 8 ते 9 वाजता वर्षाव सुरू होईल. मिथुन रास डोक्यावर येण्याच्या वेळी म्हणजे रात्री 11च्या सुमारास वर्षाव अधिक स्पष्ट आणि जास्त दिसेल. हा वर्षाव पहाटे 5पर्यंत आणि मिथुन राशीकडून पृथ्वीच्या वेगवेगळ्या दिशेने दिसेल, अशी अशी माहिती खगोल अभ्यासक मयुरेश प्रभुणे यांनी दिली.

## उल्कावर्षाव पाहाण्यासाठी कोणत्या उपकरणांची गरज?

उल्कावर्षाव पाहाण्यासाठी कोणत्याही दुर्बिणीची किंवा उपकरणांची गरज लागणार नाही. उघड्या डोळ्यांनी तुम्ही उल्कावर्षाव पाहू शकता. थंडीचे दिवस असल्यामुळे उबदार कपडे सोबत असणे योग्य ठरेल, असं ते म्हणाले.




सध्या आकाशात 46P/Wirtanen हा धुमकेतू दिसत आहे. तो सहज ओळखता येण्याची शक्यता कमी आहे. तो पाहाण्यासाठी मात्र मार्गदर्शकाची आणि दुर्बिणीची गरज आहे, असं ते म्हणाले.

# हे वाचलं का?

- जपानचे रोबो पोहोचले अशनीवर; ग्रहांची निर्मिती उलगडणार
- व्हॉएजर : अवकाश वेधाची 40 वर्षं
- शनीच्या उपग्रहावर जीवसृष्टीची शक्यता, काही मूलद्रव्य सापडण्याचा अवकाश


**परवानगी (सोशल मीडिया साईट) मजकूर?**

या लेखात सोशल मीडियावरील वेबसाईट्सवरचा मजकुराचा समावेश आहे. कुठलाही मजकूर अपलोड करण्यापूर्वी आम्ही तुमची परवानगी विचारतो. कारण संबंधित वेबसाईट कुकीज तसंच अन्य तंत्रज्ञान वापरतं. तुम्ही स्वीकारण्यापूर्वी सोशल मीडिया वेबसाईट्सची कुकीज तसंच गोपनीयतेसंदर्भातील धोरण वाचू शकता. हा मजकूर पाहण्यासाठी 'स्वीकारा आणि पुढे सुरू ठेवा'.

**मान्य करा आणि पुढे जा**

सावधान: बाहेरच्या मजकुरावर काही अॅड असू शकतात


**(बीबीसी मराठीचे सर्व अपडेट्स मिळवण्यासाठी तुम्ही आम्हाला** फेसबुक**,** इन्स्टाग्राम**,** यूट्यूब**,** ट्विटर **वर फॉलो करू शकता.)**

## मोठ्या बातम्या

**उत्तरकाशी : बोगद्यात बराच काळ अडकलेल्या व्यक्तीच्या शरीरावर काय परिणाम होतो?**

7 तासांपूर्वी

**तुम्ही प्लास्टिक किंवा कागदाचा स्ट्रॉ वापरत असाल, तर आधी हे नक्की वाचा**

2 तासांपूर्वी

**इस्रायल-हमास युद्धः हमासने सोडले ओलीस ठेवलेले 13 इस्रायली नागरिक**

24 नोव्हेंबर 2023

## बीबीसी मराठी स्पेशल



नरनाळा : बहामनी राजवट, इमादशाही, निजामशाही, भोसले ते ब्रिटीश... काय आहे या किल्ल्याचा इतिहास?

20 नोव्हेंबर 2023



सुवर्णदुर्गः कान्होजी आंग्रेंनी अरबी समुद्रातल्या या किल्ल्यामुळे रोवले पाय

13 नोव्हेंबर 2023



जंजिरा : शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांनाही कधीच जिंकता न आलेला किल्ला

19 ऑगस्ट 2023



वसईचा किल्ला : इथे पोर्तुगीजांनी वसवलेलं युरोपियन शहर, चिमाजी अप्पांनी त्यांना कसं हरवलं?

16 ऑक्टोबर 2023



पद्मदुर्ग : जंजिरा पडला नाही, पण शिवरायांनी सिद्दीला रोखण्यासाठी जंजिऱ्याच्या उरावर बांधला हा जलदुर्ग

## सर्वाधिक वाचलेले

1. पॅट कमिन्स : मुस्लीम सहकाऱ्यासाठी सेलिब्रेशन टाळणारा, भारताला 50 हजार डॉलर्सची देणगी देणारा वादग्रस्त कर्णधार
2. सतलज नदीकाठी सापडलेला 'हा' धातू संपूर्ण भारताला आणखी 'श्रीमंत' बनवू शकतो
3. उत्तरकाशी : बोगद्यात बराच काळ अडकलेल्या व्यक्तीच्या शरीरावर काय परिणाम होतो?
4. फॉरेनची आळंदी : 250 वर्षांपासून इथे जोडपी पळून येतात आणि लग्न करतात
5. क्रिप्टो करन्सीमधून गुंतवणूकदार सुनील कावुरीचे काही क्षणात बुडाले तब्बल 17 कोटी रुपये
6. 'मुर्शिद, अमेरिकन दूतावास जळतंय...' 400 हून अधिक कट्टरपंथीयांनी मक्केवर हल्ला केला आणि
7. पॅसिव्ह उत्पन्न म्हणजे काय आणि त्यासाठी किती मेहनत घ्यावी लागते?
8. पद्मदुर्ग : जंजिरा पडला नाही, पण शिवरायांनी सिद्दीला रोखण्यासाठी जंजिऱ्याच्या उरावर बांधला हा जलदुर्ग

9 **डोक्यात उवा कशामुळे होतात? त्यांचा प्रसार कसा रोखावा?**

शेवटचा अपडेट: 13 एप्रिल 2023

10 **हिरामंडी : गणिकांची जिथे सत्ता होती, पण अफगाण आक्रमणानंतर देह व्यापार सुरू झाला आणि**

शेवटचा अपडेट: 17 जून 2023

**तुम्ही बीबीसीवर विश्वास ठेवू शकता कारण**

---

**वापराच्या अटी** **कुकीज** **Do not share or sell my info**

**गोपनीयतेचं धोरण** **बीबीसीशी संपर्क साधा**

---

© 2023 BBC. बीबीसी बाह्य इंटरनेट साइट्सच्या सामग्रीसाठी बीबीसी जबाबदार नाही. बाह्य लिंक्सबद्दल आम्हाल काय वाटतं? इथे वाचा. **बाह्य लिंक्सबद्दल आम्हाल काय वाटतं? इथे वाचा.**